## अल्पसंख्यांक संस्थेच्या शाळेतील १+पदांचे विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयातील नोदंवहीमध्ये नोंद घेणे.

शासनाने घोषीत केलेल्या अल्पसंख्यांक (भाषिक/ धार्मिक) संस्थेच्या शाळेतील मुख्याध्यापकाचे एक पद आणि अन्य शिक्षक अथवा शिक्षकेतर पदांपैकी कोणत्याही तीन अशा एकूण चार पदांचे विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयातील नोंदवहीत नोंद महाराष्ट्र खाजगी शाळा कम्रचारी अधिनियम विनियम क्रमांक ३ (२) नुसार करण्यांत येते. त्यसाठी प्रस्ताव क्षेंत्रीय अधिकारी यांचेकडून विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सादर होणे आवश्यक आहे.

प्रस्तावातील आवश्यक कागदपत्रे/ प्रमाणपत्रे.

१. संबंधीत संस्थेला शासनाने अल्पसंख्यांक म्हणूंन दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत.
२. संस्थेने कोणती पदे पंजीक.त करावयाची आहेत याबाबत केलेल्या ठरावांची प्रत
३. संबंधीत संस्थेस शासनाने शांळा सुरु करण्यांस दिलेल्या परवानगी पत्राची प्रत तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी दिलेल्या परवानगी पत्राची प्रत
४. शाळेस दिलेल्या प्रथम मान्यतेची प्रत
५. संबंधीत वर्षातील शिक्षणाधिकारी यांनी केलेल्या सेवक संच निश्चितीची प्रत.